महाराष्ट्र पोलीस

जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर.
ईमेल :. cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र. ९८१९२०८२७९

" प्रेस नोट "

दि.25 / 06 / 2025

"40 वर्षीय महीलेचा खुन करून परराज्यात पसार झालेल्या 03 सराईत आरोपीनां गुन्हा केल्या पासुन 72 तासाच्या आत बिहार राज्यातुन अटक "

----------00000----------

दिनांक–14 / 06 / 2025 रोजी दुपारी 03:45 वाजताचे सुमारास कळवा पोलीस ठाण्याचे हद्दीत कावेरी सेतु रोड लगत, एका नवीन बाधंकाम सुरू असलेल्या इमारतीमध्ये एक महिला बेशुध्दावस्थेत पडल्याची माहिती पोलीस स्टेशनला मिळाली होती. सदर महीलेचे नाव शांताबाई सुरेश चव्हाण वय–40 वर्षे धंदा–बिगारीकाम राह–सम्राटनगर झोपडपटटी कळवा (पुर्व) असे असल्याचे निष्पन्न करून तिस कोणीतरी अज्ञात इसमाने धारधार शस्त्राचा वापर करून कोणत्यातरी अज्ञात कारणावरून तीचे गळयावर, छातीवर, पोटावर गंभीर स्वरूपाचे वार करून तिला जिवे ठार मारले. अशा प्रकारे मयत महिलेचे पती नामे श्री. सुरेश चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीवरून दिंनाक 14 / 06 / 2025 रोजी कळवा पोलीस स्टेशन, गुन्हा रजि.नं. 525 / 2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 103 (1), 238 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. घडलेल्या घटनेची गंभीर दखल घेवुन मा. वरिष्ठांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत स्थानिक पोलीस स्टेशन व गुन्हे शाखेस सुचना केलेल्या होत्या.

नमुद दाखल गुन्हयाचा **कळवा पोलीस स्टेशन, गुन्हे शाखा घटक 01** व **मध्यवर्ती गुन्हे शोध कक्ष** असे वेगवेगळया 03 टिम तयार करून समांतर तपास करत असतांना तपासामध्ये गुन्हा घडला त्या ठिकाणाचे सीसटीटीव्ही फुटेज प्राप्त करुन त्याच्या सहाय्याने गुन्हा केलेल्या व्यक्तींच्या वर्णनावरून त्यांचे कळवा (पुर्व) येथील तात्कालीन राहण्याचे ठिकाण तसेच कळवा, ठाणे रेल्वे स्टेशन ते कुर्ला रेल्वे स्टेशन या मार्गेक्रमणातील एकुन 90 ते 100 सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने पडताळणी केली. तसेच करण्यात आलेल्या तांत्रिक विश्लेषणामध्ये आरोपी हे गुन्हा केल्यानंतर घटनास्थळावरून निघुन गेल्याची माहिती प्राप्त करण्यात आली. आरोपीत यांचे वर्णनावरून स्थानिक रिक्षा चालक, हॉटेल व्यवसायीक यांचेकडे अधिक तपास केला असता गुन्हयामध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेले 03 आरोपीत निष्पन्न करून ते गुन्हा केल्यानंतर लागलीच त्याच दिवशी परराज्यात पसार झाल्याची खात्री झाली.

त्यावरून मा.वरिष्ठांचे परवानगीने कळवा पोलीस स्टेशन, गुन्हे शाखा घटक 01 व मध्यवर्ती गुन्हे शोध कक्ष अशा 03 टिम एकत्रित रित्या आरोपीत यांची तांत्रिक विश्लेषणावरून मिळालेल्या माहीतीच्या आधारे जिल्हा–खगडीया राज्य–बिहार येथे दिंनाक 17 / 06 / 2025 रोजी गेल्या.

तांत्रिक विश्लेषनावरून गुन्हयातील प्रत्यक्ष सहभाग असणारे 03 आरोपीत हे सराईतपणे त्यांचे अस्तित्व लपवत असल्याचे निदर्शनास आल्याने तपास पथकातील तिन्ही टिमने जिल्हा –खगडीया राज्य–बिहार येथे पोहचुन आरोपीत हे वेगवेगळया ठिकाणी असल्याचे निष्पन्न करून एक नियोजित योजना तयार करून एकाच वेळी जिल्हा–खगडीया राज्य–बिहार या शहरामध्ये तीन वेगवेगळया ठिकाणी खालील तीन टिमने सापळा रचला.

कळवा पोलीस स्टेशनचे सपोनि/संतोष पिंपळे, पोहवा/निखील जाधव, पोहवा/राहुल पवार, दादापाटील घुगे, पोना/ चद्रंभान शिंदे यांनी आरोपीत कमांक 01 विश्वजीत राजेंद्रप्रसाद सिंग वय–30 वर्षे राह–खगडीया राज्य–बिहार या आरोपीस तसेच,

गुन्हे शाखा घटक 01 चे सपोनि/विकास सुर्यवंशी, पोउपनिरी/दिपक घुगे, पोहवा/संदिप महाडीक व पोशि/सागर सुरळकर यांनी आरोपीत कमांक 02 देवराज मदन कुमार वय–19 वर्षे राह–खगडीया राज्य–बिहार या आरोपीस तसेच,

मध्यवर्ती गुन्हे शोध कक्षचे पोउपनिरी/दिपक पाटील, पोना/दिनकर सांवत, पोशि/रोहन म्हात्रे यांनी कमांक 03 विधीसंघर्षीत बालक वय–17 वर्ष 03 महीने यास,

नमुद गुन्हयातील 02 आरोपीत व 01 विधीसंघर्षग्रस्त बालक यांना एकाच वेळी दिनांक 17/06/2025 रोजी ताब्यात घेतले. नमुद आरोपीत यांना अटक करण्यात आली व 01 वि.सं.बालकास ताब्यात घेतले असुन अटक आरोपींना मा.न्यायालयाने दिनांक 01/07/2025 रोजी पावतो पोलीस कोठडी मंजुर केली आहे. वि.सं.बालकास मा. बाल न्यायालयाने बाल निरीक्षण गृहात ठेवण्याचे आदेश दिल्याने त्यास बाल निरीक्षण गृह भिवंडी येथे ठेवले आहे.

अशा प्रकारे गुन्हा केल्यापासुन 72 तासाच्या आत मध्ये ठाणे पोलीस आयुक्तालयातील वरील तीनही टिमने सतत अथक परिश्रम घेवुन बिहार राज्यामध्ये जावुन आरोपीत यांचा कौशल्यपुर्वक शोध घेवुन त्यांना नमुद गुन्हयात अटक करून उल्लेखनिय कामगीरी केली आहे.

सदरची कामगिरी मा. अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. पंजाबराव उगले, मा. अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग श्री. विनायक देशमुख, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ– 01 श्री. सुभाष बुरसे, मा. पोलीस उप आयुक्त, (गुन्हे) श्री. अमरसिंह जाधव, मा. सहा. पोलीस आयुक्त, शोध 1, गुन्हे शाखा श्री. शेखर बागडे, मा. सहा. पोलीस आयुक्त, शोध 2, गुन्हे शाखा, ठाणे श्री. विनय घोरपडे, व मा. सहा. पोलीस आयुक्त, कळवा विभाग, श्री. उत्तम कोळेकर यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली कळवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अशोक उत्तेकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. अनिल गायकवाड, पोलीस निरीक्षक (प्रशा) विठ्ठल नावडे, सपोनिरी/नाळे, सपोनिरी/धोंडे व पथक, गुन्हे शाखा घटक 01 चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सचिन गायकवाड, मध्यवर्ती गुन्हे शोध कक्षचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. श्रीकांत सोंडे, सपोनि/संतोष पिंपळे, विकास सुर्यवंशी, पोलीस उप निरीक्षक दिपक पाटील, दिपक घुगे, सुरेश माळोदे, पोहवा/संदीप महाडीक, प्रमोद ईशी, निखील जाधव, राहुल पवार, दादापाटील घुगे, पोना/चद्रंभान शिंदे, दिनकर सांवत, पोशि/रोहन म्हात्रें, महादेव हजारे, विकास चेमटे, नामदेव कोळी यांचे सह तांत्रिक माहीती मदतनीस पोहवा/समाधान माळी, दादासाहेब पाटील व पोशि/सागर सुरळकर, यांनी केली आहे.